महाराष्ट्र शासन
कार्यालय: जिल्हा क्षयरोग अधिकारी,
जिल्हा क्षयरोग केंद्र वर्धा.

दुरध्वनी क्रं. ०७१५२-२४३२४४
dtomhwdh@rntcp.org

जा.क्रं.जिक्षअ/जिक्षके/ दरपत्रके /११६८ /२५
कार्यालय : जिल्हा क्षयरोग अधिकारी, जिल्हा क्षयरोग केंद्र वर्धा दि. ३०/५/२०२५.

# दरपत्रक सुचना

प्रति,

............................................

............................................

............................................

विषय :- जिल्हा क्षयरोग अधिकारी, जिल्हा क्षयरोग केंद्र वर्धा अंतर्गत राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रमा अंतर्गत वाहन पुरवठा दरपत्रके मागविण्याबाबत

उपरोक्त विषयान्वये जिल्हा क्षयरोग अधिकारी, जिल्हा क्षयरोग केंद्र वर्धा अंतर्गत राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रम सुरळीत राबविण्याकरिता अधिकारी/कर्मचारी यांचे क्षेत्रीय भेटी करिता सर्व गावापर्यत मोबाईल X-ray सेवा प्रयोगशाळा तपासणी रुग्णाना भेटी व अत्यावश्यक औषधी साठा ने-आणण्याकरिता व इतर राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रम राबविण्याच्या दृष्टीने सदर कार्यालयास खालील प्रकारच्या चाहनाची आवश्यक आहे.

**वाहनाचा तपशिल**

| अ.क्रं. | वाहनाचे विवरण | आवश्यकता वाहने | भाडे प्रकार |
|---|---|---|---|
| १ | **Ertiga MUV (AC)** | १ | मासिक भाडे तत्वावर, वाहन फिरतीसाठी इंधन, वाहनचालक, वाहन देखभाल दुरुस्ती सह ठोक रक्कम रु. |
| २ | **Toyato Rumion MUV (AC)** | १ | |

तरी सदर **MUV** वाहनाचा पुरवठा करणेबाबत सोबत जोडलेल्या अटी व शर्तीचे आधिन राहुन मोहरबंद पाकिटेतुन दि. ६/६/२५ रोजी दुपारी ४ ......... वाजे पर्यत जिल्हा क्षयरोग अधिकारी, जिल्हा क्षयरोग केंद्र वर्धा यांचे नावे स्विकारण्यात येतील. दरपत्रके मंजुरीची अंतिम निर्णय अधिकारी मा.जिल्हा क्षयरोग अधिकारी, जिल्हा क्षयरोग केंद्र वर्धा यांना राहतील.

दरपत्रके २ मोहरबंद पाकिट पध्दतीत घ्यावी.

१) तांत्रिक लिफाफा  २) वित्तीय लिफाफा

जिल्हा क्षयरोग अधिकारी,
जिल्हा क्षयरोग केंद्र वर्धा.

# जिल्हा क्षयरोग अधिकारी जिल्हा क्षयरोग केद्रं, वर्धा

## मोहोरबंध पाकिट क्रं.१
## (कागदपत्रे) तांत्रिक

### मोहोरबंध पाकिट क्रं.१ मध्ये खालील कागदपत्रे समाविष्ट करावीत

१) वाहनांच्या आर. सी.बूक ची साक्षांकित झेरॉक्स प्रत.
२) वाहनाचा केंद्रीय मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या तरतुदी नुसार परिवहन संवर्गातील म्हणजेच प्रवासी वाहतुक परवाना (टॅक्सी परमीट) साक्षांकित झेरॉक्स प्रत.
३) वाहनांचा पूर्ण विमा भरलेले असल्याचे पॉलिसी ची साक्षांकित झेरॉक्स प्रत.
४) वाहन चालकाचा वाहन चालविण्याचा मुदती मध्ये असल्याचा परवाना ची साक्षांकित झेरॉक्स प्रत.
५) वाहनाची पी. यु. सी. ची मुदती मध्ये असल्याची साक्षांकित झेरॉक्स प्रत.
६) निविदा धारकाचे GST रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट असल्याची साक्षांकित झेरॉक्स प्रत असल्यास/नसल्यास (Decleration) प्रमाणपत्र सादर करावे.
७) आस्थापना/दुकान नोंदणी प्रमाणपत्र ची साक्षांकित झेरॉक्स प्रत.
८) मागील तीन वर्षाचे आयकर भरले असल्याचे पुरावा ची साक्षांकित झेरॉक्स प्रत.
९) अटी व शर्ती मान्य असल्याचे झेरॉक्स प्रत निविदाधारकाने स्वाक्षरी मोहोरबंध पाकिट क्रं.१ मध्ये जोडणे बंधनकारक आहे.
१०) वाहनधारकाचे वाहन हे तीन वर्षा खालील असावे.

# कार्यालय

## जिल्हा क्षयरोग अधिकारी

## जिल्हा क्षयरोग केंद्र वर्धा.

### मोहोरबंद पाकिट-२

### (वित्तीय)

मोहोरबंद पाकिट क्रं. २ आर्थिक निविदा भरण्याचा नमुना खालील प्रमाणे.

| वाहनाचा प्रकार (कंपनीचे नाव) | वाहन नोदंणी क्रं. व खरेदी दिनांक | ठोक रक्कम मासिक भाडे तत्वाकरिता |
|---|---|---|
| | | २०००कि.मी. पर्यत प्रति महिना फिरतीकरिता, इंधन, वाहन चालक, वाहन देखभाल दुरुस्ती सह प्रति महिन्याकरिता ठोक रक्कम रु. |
| | | पुढिल अतिरिक्त धाव प्रति कि.मी. करिता |

मी ............................................. लिहुन देतो कि उपरोक्त नमुद दरात सर्व कर तसेच वाहतुक इंधन, वाहन चालक, वाहन देखभाल संपुर्ण खर्चाचा समावेश आहे त्यास मी बांधिल आहो. या निवेदेतुन नमुद सर्व अटी व शर्ती मला मान्य असुन या करिता मी हमी घेतो.

दिनांक :-

ठिकाण :-

वाहन धारकाची स्वाक्षरी

संपुर्ण नाव :-

पत्ता :-

मो.क्रमांक :-

## वाहन मासिक भाडे तत्वावरिल वाहन – नियम, अटी व शर्ती

१) सदर वाहन हे अति आवश्यक सेवे करिता व रुग्ण सेवे करिता उपयोगीता असणार असल्यामुळे या कार्यालया मार्फत पुरवठा धारकांशी तसेच वाहन चालकाशी संपर्क केले असता विना विलंब वाहन २४/७ उपलब्ध करुन दयावे.(हमी पत्र)

२) वाहनाच्या भाड्याचे दर करारनाम्याच्या दिनांकापासुन दिनांक / /२०२५ ते दिनांक / /२०२६ या कालावधी करिता अगर ११ महिन्यासाठी मान्य राहील. या कालावधी मध्ये दरात कोणत्याची कारणास्तव बदल होणार नाही.

३) पुरवठा केले जाणारे वाहन १ जून २०२० च्या बनावटीचे किंवा यानतंरचे असावे. व ज्या वाहनाचे दस्तावेज सादर करण्यात येतील तेच वाहन ऑनकॉल बेसेस तत्वावर अथवा मासिक भाडे तत्वावर निविदा कालावधी करिता कार्यालयास देणे बंधनकारक राहील सामान्य परिस्थिती मध्ये अन्य बदली वाहन स्विकारले जाणार नाही.

४) मोटार वाहन कायदा सन १९८८ मधील तरतुदी प्रमाणे वाहनाची सर्व प्रमाणपत्रे वैध असावीत.

५) वाहनाचा केंद्रीय मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या तरतुदी नुसार परिवहन संवर्गातील म्हणजेच प्रवासी वाहतुक परवाना( Taxi permit) कागदपत्रे वैध असणे आवश्यक आहे.

६) मुबंई मोटार वाहन कायदयाप्रमाणे वाहनाच्या सर्व प्रकारच्या कराची रक्कम भरलेली असावी.

७) वाहनाचा थर्ड पार्टीसह पुर्ण विमा कायम उतरविलेला असावा.

८) वाहन पुरवठा धारकाने नियमानुसार पी.यु.सी. वैध प्रमाणपत्र वाहना सोवत ठेवावे.

९) वाहनाचा सर्व कर भरणा केलेला असल्याचे व आवश्यक परवाने अद्यावत असल्याबाबतचे संबंधित कागदपत्रे नेहमी वाहन चालकासोबत असणे तसेच एक प्रत कार्यालयात जमा करणे आवश्यक राहील.

१०) वाहन चालका जवळ वाहन चालविण्यासाठी प्रचलित कायद्यानुसार वैध लायसन्स असावी.

११) कार्यालयाने मागणी केल्यास वाहन चालकांच्या एकंदरीत वर्तणुक व चारित्र्याबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त करुन देण्याची जवाबदारी वाहन मालकाची राहील.

१२) वाहन मासिक भाडे तत्वावर असल्यास २४ तास कार्यालयासाठी असेल त्यासाठी वाहन चालकाला कोणताही अतिरिक्त भत्ता तसेच चहा/नाष्टा/जेवण दिले जाणार नाही अथवा वाहनाच्या दरात भाडे वाढ दिली जाणार नाही (रात्री संस्था भेटीवरुन येतांनी उशीर झाल्यास तसे वाहनाचे वेगळे अतिरिक्त भाडे देण्यात येणार नाही) व ऑनकॉल बेसेस तत्वावर मागितले असल्यास तसे आपणांस पत्राद्वारे कळवुन दिलेल्या वेळी वाहन इंधन , वंगन व वाहन चालकासह सदर वाहन योग्य स्थितीत उपलब्ध करुन देण्याची जवाबदारी वाहन पुरवठा धारकाची राहील.

१३) वाहन जिल्हा क्षयरोग अधिकारी, जिल्हा क्षयरोग केंद्र वर्धा यांचे अधिपत्याखाली राहील.

१४) वाहन मालकाला जर वाहन करारनामा रद्द करावयाचा असल्यास तेव्हा एक महिना अगोदर

पुर्वसुचना म्हणुन नोटिस द्यावी लागेल.

१५) सर्वात कमी दर असलेल्या वाहनाला किरायाने लावण्यास अंतिम आदेश देण्यापुर्वी(फोरमॅन परिवाहन सामान्य रुग्णालय वर्धा) यांचेकडुन तपासणी करुन वाहन कामासाठी योग्य असल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य राहील.

१६) निविदा स्विकृत झाल्यास कंत्राट दारात रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर निविदातील अटी शर्ती मान्य असल्याच्या विहित नमुन्यात दोन साक्षीदाराच्या स्वाक्षरीने करारनामा तसेच मुळ रक्कमेच्या ३ टक्के एवढी सुरक्षा ठेव जमा करावी लागेल. याकरिता (District Integrated Health and Family Welfare Soc, NTEP), Bank Account number "7130630921" Indian Bank Branch Wardha. IFSC CODE – IDIB000W020 यांचे नावे राष्ट्रीय कृत बॅकेचा धनाकर्ष कार्यालयात जमा करावा लागेल. सुरक्षा ठेवीवर कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

१७) पुरवठा धारकाने एक वर्षाचा कालावधी पुर्ण न करता मध्येच कंत्राट सोडुन दिला अथवा अटी व शर्ती भंग केल्यास त्यांची सुरक्षा ठेव (Security Deposite) जप्त करण्यात येईल.

१८) वाहन पुरवठा दाराने अटी व शर्ती प्रमाणे वाहन न पुरविण्यास किंवा त्यानंतर अन्य कोणत्याही अटी व शर्तीचा भंग केल्यास संबंधित वाहन धारकास सात दिवसांची पुर्वसुचना देऊन करार रद्द करण्याचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद वर्धा यांना राखुन ठेवला आहे.

१९) वाहन कर्तव्यावर असताना नादुरुस्त /खराब झाल्यास त्या ठिकाणी त्वरित दुसऱ्या वाहनाची व्यवस्था करण्याची जवाबदारी पुरवठा धारकांची राहील अन्यथा असे न झाल्यास सदर दिवसाचे वाहन भाडे अदा करता येणार नाही.

२०) वाहन पुरवठा दाराने निर्धारित केलेल्या कर्तव्यासाठी वाहनाचा पुरवठा न केल्यास मुख्य कार्यकारी निर्धारित करतील तो दंड अधिक वाहन बाजारातुन भाड्याने घेण्यात येईल व त्यास त्यादा भाडे द्यावे लागल्यास अश्या जादा भाड्याची वसुली वाहन पुरवठा दाराकडुन वसुल करण्यात येईल.

२१) वाहन मासिक भाडे तत्वावर असल्यास कार्यालयीन परवानगी शिवाय वाहन खाजगी रित्या वापरता येणार नाही. जर अनधिकृत पणे खाजगी प्रवासी वाहतुक करण्यासाठी वाहनाचा वापर केला जात आहे असे निर्दशानास आल्यास सदरचा करार रद्द करण्यात येईल व पुनःश्च करार पर्यतच्या कार्यवाहीचा सर्व खर्च पुरवठादार यांचे कडुन वसुल करण्यात येईल.

२२) वाहन वापरा बाबतची दैनदिन अधिकृत माहिती कार्यालयीन सुचनेनुसार (उदा. दिनांक , फिरतीचे ठिकाण, वेळ, वापर ,किमी, अधिकारी यांचे नाव व स्वाक्षरी इत्यादी) नियमित पणे कार्यालयात सादर करणे अनिवार्य राहील त्यानंतरच वाहन भाडे अदा करता येईल.

२३) वाहन कर्तव्यावर असतांना अपघात झाल्यास व वाहनातील प्रवाश्यास इजा, दुखापत,मुत्यु झालेस किवा त्या अनुषंगाने होणारा सर्व खर्च / नुकसान भरपाई वाहन पुरवठादाराने देणे बंधनकारक

राहील.

२४) वाहन भाड्याच्या देयका मधुन नियमानुसार अनुज्ञेय असलेली आयकर कपात कार्यालयाद्वारे करण्यात येईल.

२५) वाहन दुसऱ्या गावावरुन इंधन आणण्यासाठी किंवा दुरुस्ती करिता वाहन गेले असता होणारी धावसंख्या सुद्धा सदर धावसंख्येत समाविष्ठ होणार नाही.

२६) वाहन सुस्थितीत असल्याबाबतचे तसे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.कराराच्या दरम्यान काळात वाहनाच्या भागांची (टायर,ल्युब्रीकेट्स,डिझेल)किमतीचे वाढ झाल्यास कुठलेही प्रकारचे दर वाढवले जाणार नाहीत/तशी मागणीही करता येणार नाही.याबाबतचा अंतिम निर्णय मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वर्धा यांचा राहील.

२७) वाहनाचा दुरुस्ती, टायर, ट्युब रिपेरिंग, ऑइल बदली, इंधन व इतर आवश्यक वाहनाचा खर्च हा सर्व पुरवठादाराने करावयाचा असुन याबाबत कोणताही खर्च/भरपाई कार्यालयाद्वारे देय राहणार नाही.

२८) लखोटा क्रं. १ (तांत्रिक दस्ताावेज मध्ये जे जे वाहन पुरवठा दाराकडे भाड्याने देणे करिता अटी व शर्ती नुसार उपलब्ध आहेत त्या त्या वाहनाचे संपुर्ण कागदपत्रे जोडणे आवश्यक राहील.

२९) लखोटा क्रं. २ (आर्थिक) नमुन्यातील भरणेत आलेले निविदा धारकांचे दर प्रती वाहन ऑन कॉल बेसिस करिता फिरती सह इंधन, वाहनचालक, वाहन देखभाल दुरुस्तीसह ठोक रक्कम ही प्रती दिन २०० किमी साठी बंधनकारक राहील व मासिक भाडे तत्वाकरिता २००० किमी साठी बंधनकारक राहील.

३०) वाहनाची फिरती नागपुर डिव्हीजन विभागीय सभा, STDC सभा, व इतर ठिकाणी असल्यास टोल टॅक्स विभागाकडे राहील व वर्धा जिल्हा अंतर्गत शासकिय कामासाठी फिरती असल्यास पुरवठा धारकाकडे राहील.

३१) निधी उपलब्धेनुसार वाहनांचे देयक अदा करण्यात येतील.

३२) वाहन पुरवठादार यांनी निविदेमधील अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे करारपत्रक रक्कम रु. ५०० /- च्या कोर्ट फी स्टॅम्पवर सादर करणे बंधनकारक राहील.

३३) करारामध्ये उद्‌भणाऱ्या कोणत्याही विवादास्पद मुद्यावर अंतिम निर्णय देण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वर्धा यांना राहील. कोणतेही कारण न देता प्रस्तुत करार रद्द करण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वर्धा यांना राहील.

# Annexure – A (On Firm's Letterhead)

**(In case of incomplete information, Quatation will be summarily rejected)**

1. Name and address of the firm :-

2. Registered Head office postal Address :-

3. Telephone No. Fax & E-Mail :-

4. In case of proprietorship / Partnership firms, / Names of proprietors / Partners

   / Direction with address and percentage of share :-

5. Ownership Status of the Firm :-

   (Maharashtra Govt. /Central govt./ Jt.Sector/Co-oprative / SSI/ Private)

6. Whether tendering as a Manufacturer / Importer :-

7. Name of the person & phone No. who should be contacted by this office in case

   of any required Communication.

8. Full address with Email. ID , phone no. and Location of original manufacturing work/

   Factory.

I /We hereby declare that particulars furnished above are true to the best of my / our knowledge and belief and that if any of the particulars is found to be materially incorrect / misleading, my /our tender shall be rejected and I / we rae liable for penal action as per terms specified in the "Term and conditions of Tendor".

**Date:**

**Full Signature of the Tenderer**

**With official seal and address**

# -: निविदा उघडणे बाबत :-

१) निविदा दिनांक ०१/६/२५ रोजी सांयकाळी ४ वाजता जिल्हा क्षयरोग अधिकारी, जिल्हा क्षयरोग केंद, वर्धा येथे उघडण्यात येईल. विहित तारिख व वेळेत निविदा धारकांनी नियोजित दिनांकास व वेळेत उपस्थित राहावे, या करिता वेगळा पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.निविदा धारक वेळेवर उपस्थित नसले तरीही निविदा उघडण्याची प्रक्रिया पुर्ण करण्यात येईल.

२) निविदेत नमुद दस्ताऐवजाची पुर्तता करित असल्याचे आढळल्यावरच वित्तीय मोहरबंद पाकिट क्रं. २ उघडण्यात येईल, याबाबत निविदा समितीचा निर्णय अंतिम राहील.

३) निविदा स्विकृत करणे, अथवा नाकारणे तसेच अटी मध्ये शिथिलता करण्याचे अधिकार किंवा संपुर्ण निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार समितीने राखुन ठेवले आहेत.